**International Journal of Advance and Applied Research**
www.ijaar.co.in
**ISSN – 2347-7075** **Impact Factor – 7.328**
**Peer Reviewed** **Bi-Monthly**
**Vol.9 No.5** **May – June 2022**

# कोविड 19 चा प्रसार आणि बदलते आंतरराष्ट्रीय संबंध

**प्रा. प्रशांत तुकाराम गांजवे**
सहाय्यक प्राध्यापक, अर्थशास्त्र विभाग, बळवंत कॉलेज, विटा, ता.खानपूर, जि.सांगली
***Corresponding Author-* प्रा. प्रशांत तुकाराम गांजवे**

**प्रस्तावना :**

जगाला गेल्या शंभर वर्षामध्ये कुठल्याही साथ रोगाने महामारीने केली नसेल एवढी जीवित व आर्थिक हानी झाली आहे. कोविड- १९ च्या कालावधीमध्ये संपूर्ण जग एका महामारीशी लढा देत होते. कोविड- १९ मुळे जगातील वेगवेगळया देशांमध्ये आणि आपल्या भारतामध्ये कोविड-१९ या साथीच्या रोगामुळे फार मोठया प्रमाणावर जीवित व वित्त हानी झालेली आहे. आपण आजही पाहतो किंवा ऐकतो की भारतीय अर्थव्यवस्था ही कृषिप्रधान अर्थव्यवस्था आहे. परंतु अलिकडच्या कालावधीत या क्षेत्रातील प्रमाण कमी कमी होत चालले आहे. आणि सेवा क्षेत्राचे प्रमाण वाढताना दिसून येते. कोरोनाच्या कालावधीमध्ये आपल्या अर्थव्यवस्थेच्या जी.डी.पी. चा विचार केला तर ती उणे (-) गेलेली दिसून येते. कोरोना कालावधीत निर्माण झालेले साथीचे रोग आजही आपल्यात ठाण मांडून बसलेले आहेत. आपल्या समाजात साथीच्या रोंगाविषयी अनेक अफवा, गैरसमज, दंतकथा, अंधश्रध्दा पसरवल्या जात आहेत. प्लेग, पटकी, कॉलरा, देवी या साथीच्या रोगांबाबत हेच घडले आहे. जगाच्या इतिहासातील सर्वात मोठी ऐतिहासिक घटना किंवा महामारी असं वर्णन करावे लागणाऱ्या कोविड-१९ या साथीच्या रोगाचा फटका संपूर्ण जगाला बसलेला आहे. या भयानक अशा साथीच्या रोगामुळे भिती, काळजी, बेजबाबदारपणा, अतिरिक्त सावधगिरी, धास्ती, हळळ अशा अनेक स्वरूपात लोकांच्या प्रतिक्रिया निर्माण झाल्या. या काळात सर्वात मोठी गोष्ट घडून आली ती म्हणजे जीवघेण स्थलांतर. कोरोनाच्या आगमनानंतर जगाच्या अर्थकारणात अनेक अमुलाग्र बदल घडून आले. चीन-अमेरिका यांच्यातील वाद, औषध, उपकरणे यांच्या आयात निर्यातीमधील झालेले विवाद, या घटकांचा तुटवडा, औषध व लस निर्मात्या कंपन्यांचे अर्थकारण हा सर्व प्रकार स्मरणात राहण्यासारखा आहे.

**अभ्यास विषयाचे महत्व :**

कोविड-१९ हा विषाणू यापूर्वीच्या साथरोगांपेक्षा खूपच वेगळा, तीव्र संसर्ग क्षमता असलेला व प्रचंड जीवित हानी घडविणारा आहे. तब्बल एक वर्ष त्यावरती लस व औषध उपलब्ध नव्हते. परिणामी त्यांच्या संसर्गाने झालेले मृत्यू रोखण्यासाठी जी टाळेबंदी झाली त्यातून निर्माण झालेले प्रश्न, आंतरराष्ट्रीय बदलते संबंध, खनिज तेलाला कोरोनाचा झालेली बाधा, जगातील अर्थव्यवस्थांवर ओढावलेले संकट, त्यावरील उपाय यांचा शास्त्रशुद्ध, तर्काधीष्टीत अभ्यास होणे खूपच म्हत्वाचे आहे.

**उद्दिष्टय :**

सदर विषयावरील संशोधन करीत असताना पुढील उद्दिष्टय समोर ठेवण्यात आलेली आहेत.

१. खनिज तेलाला कोरोनाची झालेली बाधा स्पष्ट करणे.
२. कोरोनाने बदललेल्या आंतरराष्ट्रीय संबंधाचा अभ्यास करणे
३. करोना साथीमुळे मजुरांची दुरावस्था समजावून घेणे.

**सशोधन पद्धती :**

सदर विषयावरील संशोधन करीत असताना विषयाशी संबंधित संदर्भ पुस्तके, विविध संकेत

स्थळांवरील उपलब्ध माहिती, नियतकालीके, मासिके, दैनिके, सहामाही व वार्षिक व साप्ताहिक अंक, भारतीय व जागतिक अर्थकारणाशी संबधित २०१९ -२०२० वर्षातीत आकडेवारी, माहिती, घटना याचा आधार घेतलेला आहे.

**कोविड १९चा उगम आणि प्रसार :**

कोरोना व्हायरसच्या उगमाविषयी अजूनही फार मोठया प्रमाणात मतभेद असलेले दिसून येतात. काहींच्या मते हा व्हायरस चीनच्या वुहान शहरातील मीट मार्केटमधून आला तर काहींच्या मते, चीनमध्ये आढळून येणाऱ्या वटवाघळांच्या सूप मधून आला अशी वेगवेगळी मते आजपर्यंत आपणास ऐकवयास मिळतात. यामध्ये सर्वात महत्वपूर्ण बाब म्हणजे भारतातील वटवाघळांमध्ये आढळून आलेला हा कोरोना विषाणू माणसांमधील कोरोना विषाणुपेक्षा वेगळा आहे. हा विषाणू संसर्गित व्यक्तिच्या शिंक व खोकल्यापासून इतर व्यक्तिपर्यंत जावून कान, नाक, डोळे, तोंड याद्वारे तो माणसांच्या शरीरात प्रवेश करतो. सुरूवातीला सर्दी, खोकला व ताप अशी त्याची लक्षणे होती. मानवी घशात जराशी जरी जागा मिळाली की तो जलदगतीने फुफुसांवर ताबा मिळवतो आणि पाच ते सात दिवसांत तो संपूर्ण शरीराचा ताबा मिळवू शकतो. हे सर्व हा विषाणू अत्यंत भयानकपणे करतो. सर्व संशोधकांनी वटवाघळे ही कोरोनाची प्रसारक असल्याचे सिध्द केले आहे. भारत सरकारने कोरोना व्हायरसने मृत्यु पावणाऱ्या लोकांच्या अंत्यविधीसाठी मार्गदर्शक नियम व सूचना जारी केल्या ते मार्गदर्शक नियम पुढीलप्रमाणे.

१. कोरोनाबाधित मृतदेहाचा अंत्यसंस्कार करण्यापूर्वी स्मशानभूमी निर्जंतुक करण्यात यावी.

२. मृतदेहाला मिठी मारण्यावर व त्याच्या जवळ जाण्यास बंदी राहील. लोकांनी मृतदेहाचे दूरनच अंत्यदर्शन घ्यावे.

३.मृतदेहाला कुणीही स्पर्श करू नये. ज्या रितीरिवाजांमध्ये मृतदेहाला स्पर्श करण्याची गरज नाही असे रितीरिवाज पार पाडता येतील.

४. अंत्यसंस्कारानंतर त्यात सहभागी सर्व लोकांनी हात स्वच्छ धुणे अनिवार्य असेल.

५. तसेच अंत्ययात्रा व अंत्यविधिसाठी मोजक्याच लोकांना परवानगी दिली जाईल.

यावरून असे दिसून आले की, यापेक्षा आपले मोठे दुर्देव असू शकत नाही. आपल्या देशामध्ये एखाद्या व्यक्तिच्या निधनानंतर सगळे घर, कुटुंबिय, नातेवाईक, शेजारी, मित्रपरिवार सहभागी होतात. परंतु कोरोना व्हायरसच्या भितीने अनेकांचा मृत्यु झाला आहे. खरं तर कोरोना व्हायरसने आपल्याला वास्तवाची जाणीव करून दिली आहे. कोरोनामुळे हे दिसून आले की, जग जरी आता सोशल मिडियावर जाऊन रमल असेल तर अंत्यविधिही असेच व्हायला हवे. हे नव सत्यच जणू कोरोना व्हायरसने जगासमोर ठेवले. या कोरोना महामारीच्या जागतिक संकटामध्ये मजुरांच्या स्थलांतरावर मोठया प्रमाणात प्रभाव पडलेला दिसून येतो. देशामध्ये फार मोठया प्रमाणातील मजुर उद्योग, व्यवसाय व रोजगाराच्या निमित्ताने एका राज्यातून दुसऱ्या राज्यात, दुसऱ्या देशात फार मोठया प्रमाणात स्थलांतर करतात. यामध्ये चहावाले, फेरीवाले, वडापाव, चायनीज, कारखाने, शेतातील मजूर, घरकाम, दुधवाले, सुतगिरण्या अशा विविध क्षेत्रात, व्यवसायात, उद्योगात हे लोक समाविष्ट होतात. हे लोक कष्टाने पैसा कमवितात आणि तो काटकसरीने खर्च करतात आणि जो पैसा शिल्लक राहतो तो पैसा ते आपल्या गावी असणाऱ्या आई, वडील, भाऊ, पत्नी यांना पाठवून देत असतात. कोविड महामारीच्या कालावधीत अनेक छोटे मोठे उद्योग बंद पडले. त्यामुळे या मजूरांना प्रचंड मोठया असुरक्षिततने घेरले. भीतीने पछाडलेले हे मजूर जमेल त्या मार्गाने, मिळेल त्या साधनाने, जीवाची पर्वा न करता मुलांना, वृध्दांना नेता येईल त्या साधनाने आपल्या सामानासह आपल्या राज्यात, आपाल्या गावात जाण्यासाठी धावू लागले. या कालावधीत अनेक मजुरांना आपले

जीव गमवावे लागले. कोरोना कालावधीत स्थलांतरीत मजूरांवर फार मोठया प्रमाणावर परिणाम झालेला दिसून येतो.

**कोरोना काळातील बदलते आंतरराष्ट्रीय संबंध:**

डिसेंबर २०१९ मध्ये आलेल्या जागतिक संकटाने म्हणजेच कोरोना व्हायरसमुळे संपूर्ण जग आज बदललेले दिसून येते. या काळामध्ये दोन देशातील आंतरराष्ट्रीय संबंधामध्ये अमुलाग्र स्वरूपात बदल झालेले दिसून येतात. देशांमधील आंतरराष्ट्रीय व्यापार होत असताना त्यामधील पर्यटन हा घटक महत्वाचा असल्याचे दिसून येते. भारतात दर महिन्याला २१ लाख लोक विमानमार्गानी वेगवेगळया देशातून भारतात येतात. कोरोना कालावधीतही फार मोठया प्रमाणात परदेशातून लोक भारतात आले होते. ३० जानेवारी २०२० ला भारतातील केरळ राज्यात पहिला कोरोना विषाणू आढळून आला. या घटनेनंतर जगातील वेगवेगळया देशांनी आपल्या देशात येणाऱ्या प्रवाशांवर बंदी घातली. यामुळे देशा-देशांमधील असणारे आंतरराष्ट्रीय संबंध बदललेले दिसून येतात. जगातील अनेक देशांमध्ये जी टाळेबंदी जाहीर केली आहे. त्या टाळेबंदीला परिणाम त्यांना भोगावा लागला. कारण या टाळेबंदीच्या कालावधीत फार मोठे नुकसान झालेले दिसून येते. ही झालेली हानी एका क्षेत्रापुरती मर्यादित न राहता ती सर्वच क्षेत्रात म्हणजे प्राथमिक क्षेत्र, द्वितीय क्षेत्र आणि तृतीय क्षेत्र या सर्वच क्षेत्राला या कोरोना महामारीच्या संकटाने फार मोठा फटका बसलेला दिसून येतो. या कालावधीत अनेक उद्योगधंदे डबघाईला आलेले होते. काही उद्योगधंदे तोटयात जावून ते आज बंद पडलेल्या स्थितीत आहेत. ही कोरोना महामारीवर दोन वर्षे उलटून गेले तरी अजूनही त्यावर गुणकारी लस वा औषध निर्माण झालेले नाही. जोपर्यंत औषध वा लस निर्माण होत नाही. तोपर्यंत आपणास आवश्यक ती काळजी घेणे गरजेचे आहे. औषध वा लस निर्माण होत नाही तोपर्यंत जगातील लोकांचे जीवनमान व व्यवहार पूर्वी प्रमाणे सुरू होण्यास वेळ लागणार आहे. यातून भारताला आर्थिक, सामाजिक व मानसिक परिणामांना सामोरे जावे लागणार आहे. या कोरोना महामारीच्या कालावधीत अनेकांच्या नोकऱ्या, व्यवसाय बंद पडलेले दिसून येतात. अनेकांच्या शिक्षणात खंड पडलेला आहे. या सर्वांतून आज ना उद्या मार्ग निघेल आणि जगातील वेगवेगळया देशांचे संबंध सुधारतील. मानवी जीवनमान पुन्हा पूर्ववत सुरळीत होईल. यामाध्यमातून आंतरराष्ट्रीय संबंधही सुधारत जातील.

या कोरोना महामारीच्या जागतिक संकटामध्ये एक चांगली गोष्ट घडताना दिसली ती म्हणजे या महामारीवर औषध शोधण्यासाठी वा लस निर्माण करण्यासाठी जगातील वेगवेगळया देशातील शास्त्रज्ञ एकत्र येवून औषध वा लस निर्माण करण्याचा प्रयत्न करत आहेत. ही लस शोधण्यासाठी विकसित देश, अविकसित देश, विकसनशील देशातील शास्त्रज्ञ एकजुटीने प्रयत्न करताना दिसतात. अमेरिका चीन, फ्रान्स, इटली आणि इंग्लंड, भारत या देशातील शास्त्रज्ञ प्रयत्न करताना दिसतात. त्याचप्रमाणे इतरही देशातील शास्त्रज्ञ या लसीच्या निर्माण करण्याच्या प्रक्रियेत सहकार्य करीत आहेत. आपणास माहित आहे की हेच वेगवेगळया देशातील शास्त्रज्ञ स्वतः केलेल्या संशोधनाचे क्रेडीट, पेटंट मिळवणे यात मशगूल होते. तसेच ही वैज्ञानिक मंडळी आपला शोधनिबंध, संशोधन प्रसिध्द होईपर्यंत कमालीची गुप्तता पाळताना दिसतात. मात्र या महामारीच्या कालावधीत औषध वा लसीच्या निर्मितीबाबत जागतिक पातळीवर सर्वच स्थरांतील वैज्ञानिकामध्ये एवढया प्रचंड मोठया प्रमाणात सहकार्य केले गेले की, जर समजा यातील एखाद्या वैज्ञानिकाला आपल्या प्रयोगादरम्यान वा चाचणीमध्ये जर या विषाणूबाबत काही नवीन आढळून आले तर ते लगेच जागतिक आरोग्य संघटनेने तयार केलेल्या कॉन्फरन्स लींकवर जावून त्यावर असलेल्या इतर शास्त्रज्ञांना माहिती सांगतात. मग इतर देशातील वैज्ञानिक हे संशोधन, शोध पुढे घेवून जातात. यात ज्यांच्याकडे अद्यावत साधनसामग्री आहे ते या संकल्पनेचा मोठया प्रमाणावर विस्तार करतात. आजवर यातून २०० पेक्षा जास्त क्लिनीकल ट्रायल्स झालेल्या आहेत. चीनच्या

वैज्ञानिकांनी कोणत्याही विषाणूचा एक जीनोम कोड असतो तसाच कोरोना विषाणूचा असलेल्या असाच जीनोम कोडचे डीकोडींग करण्यामध्ये यश मिळविले आहे. त्यामुळे आता त्यांच्या मार्गदर्शनाखाली जगातील सगळे शास्त्रज्ञ काम करत आहेत. परिणामी आज कोरोनाकाळाने जगाला एक नवी दिशा दिली आहे. जिथे सर्वच शास्त्रज्ञ एकत्र येवून काम करत आहेत. सर्व जगभरातील शास्त्रज्ञांमधील कोरोना काळातील ही सहकार्याची वृत्ती पुढील काळातही तशीच चालू राहिली तर जगात एक नवीनच सहकार्यांचे वातावरण निर्माण होईल. कारण सर्वसाधारणपणे शास्त्रज्ञ वा वैज्ञानिक वर्गातील लोक परस्परांना एवढे सहकार्य करताना दिसत नाहीत. कोरोनाविषयक संशोधनात त्यांनी केलेले काम हे अतिशय अप्रतिम व अनोख्या स्वरूपाचे आहे. बऱ्याचशा शास्त्रज्ञ आणि वैज्ञानिकांनी पुण्याच्या 'सीरम' या इंस्टीटयूटशी संपर्क साधला आहे. जेव्हा या सर्व जागतिक वैज्ञानिक समूहाला कोरोनावरील लस शोधण्यात यश येईल तेव्हा संपूर्ण जगासाठी त्याचे मोठया प्रमाणावर उत्पादन आणि वितरण करणे गरजेचे आहे. त्यासाठी हे वैज्ञानिक ज्या ज्या संस्थांशी वा इंस्टीटयूटशी संपर्क साधत होते. त्यापैकीच एक आहे पुण्यातील सीरम इन्स्टिटयूट आज औषधांच्या वा लसीच्या मोठया प्रमाणावरील उत्पादनांच काम त्यांना दिले गेले आहे. त्यासाठी येणाऱ्या अवाढव्य खर्चाची रक्कम देण्यासाठी जगातील अनेक दानशूर पुढे आले आहेत. काही दिवसांपूर्वीच एका शास्त्रज्ञाची न्यूयार्क टाईम्सला एक मुलाखत छापून आली होती. त्यात त्यांनी असे सांगितले की, आम्ही जे संशोधन एकत्र येवून करतो त्यामध्ये माझा देश, तुझा देश, माझी भाषा, तुझी भाषा, माझा झेंडा, तुझा झेंडा असा कोणताही विचार नसतो. मात्र यांच्या अगदी उलट विविध देशाचे राज्यकर्ते मात्र त्याद्वारे परस्परांवर कुरघोडया करण्याचा प्रयत्न करत असतात. सध्या देखील असेच चाललेले आहे. अमेरिका, चीन वा युरोपातील इतर देशांना दोष देत आहेत. युरोपातील राजकीय नेते इतर देशांना दोष देत आहेत. तर चीनमधील नेते अमेरिकाला दोष देत आहेत. जोपर्यंत कुठल्याही राजकीय पक्षाला कोरोनाच्या संकटावर उपाय सापडत नाहीत. तोपर्यंत ते असेच एकमेकांना दोष देत राहणार आहेत.

**कोरोना काळातील जागतिक स्थित्यंतरे**

टाळेबंदीच्या काळात आपण सर्व व्यवहार ऑनलाईन पध्दतीने सुरू होते. यामध्ये अन्नधान्य, शिक्षण, औषधे, बँकिंग व्यवहार, या सर्वांचा समावेश होतो. या सर्व सेवा देणाऱ्या कंपन्या या जागतिक पातळीवर चीनच्या मालकीच्या आहेत. त्यामुळे या माध्यमातून होणारे सर्व ऑनलाईन व्यवहारातून मिळणारा नफा हा चीन या देशाला मोठया प्रमाणात मिळू लागला. त्याचप्रमाणे चीन या देशाची अनेक देशातील मोठया कंपन्यांमध्ये भागीदारी असल्याचे दिसून येते. यामध्ये प्रामुख्याने ज्या कंपन्या अग्रेसर आहेत त्यामध्ये बीग बास्केट, प्लीप कार्ड, पैसा बाजार, स्नॅप डील यांसारख्या कंपन्याचा समावेश होतो. या सर्वच कंपन्या ऑनलाईन बिझनेस करत आहेत. अगदी किचनमधील वस्तू, ऑनलाईन औषधे, विमा या सुविधा ऑनलाईन सहज उपलब्ध होवू लागल्या आहेत. म्हणजेच आर्थिक उलाढालीत चीन हा देश अग्रेसर असलेला दिसून येतो. आपण ज्या वस्तू आणि सेवा ऑनलाईन विकत घेता यामध्ये चीन या देशातील वस्तूंचा आणि कंपन्यांचा सहभाग मोठया प्रमाणात आहे. यामुळे त्यामधून चीनला मोठया प्रमाणात चलन प्राप्त होते. जागतिक बाजारपेठेत पाहिले तर आपणास सर्वात स्वत किंमतीच्या वस्तू या चीनी कंपन्यानी निर्माण केलेल्या दिसून येतात. अगदी आपल्या रोजच्या दैनंदिन जीवनामध्ये पाहिले तरी आपणाला दिसून येईल की आपण किती चीनी वस्तू वापरत आहे. आपण वापरत असलेल्या मोबाईलमध्ये कितीतरी ॲप हे चीनी कंपन्यांनी बनविलेली आहेत आणि या माध्यमातून चीन वेगवेगळया देशांवर आर्थिक आक्रमण करत आहे. सध्या जागतिक पातळीवर चीन हा देश आर्थिक क्रियांच्या बाबतीत पुढारलेला दिसून येतो.

**खनिज तेलाला कोरोनाची बाधा :**

कोरोनाच्या महामारीच्या काळात सगळीकडे कोरोना साथरोगाने थैमान घातलेले तर

दुसरीकडे खनिज तेलाला झोलेली कोरोनाची बाधा. खनिज तेलाचे उत्खनन चालु असताना ते बंद करता येत नाही. कोरोना रोगाच्या प्रादुर्भावामुळे २० एप्रिल २०२० मध्ये अमेरिकेमध्ये कच्च्या तेलाच्या किंमती इतक्या स्वत झालेल्या की, तेल उत्पादक कंपन्या म्हणत होत्या की, आमच्याकडून तेल फुकट घेवून जा. आत्तापर्यंतचा इतिहास पाहिला तर असे कधीच घडून आले नाही. मात्र आता प्रश्न असा उपस्थित होतो की, कोरोनामुळे ठप्प असलेल्या जागतिक अर्थकारणाने मागणीत कमालीची घट होवून अमेरिकन तेलबाजारातील किंमती खाली बसल्या. पण त्या शुन्याच्याही खाली म्हणजे ऋण ३८ एवढया कशा झाल्या. खर तर हा सगळयांनाच पडलेला महत्वाचा प्रश्न होता. तेल फुकट विकून देखील उलट ते घेणाऱ्या ग्राहकांनाच त्याचे पैसे दयायला तेल कंपन्या कशा काय तयार झाल्या? आपण जेव्हा या उत्तराचा विचार करतो तेव्हा आपल्यासमोर कोविड-१९ हे नाव समोर येते. टाळेबंदीमुळे जगभरातील उद्योगधंदे, व्यापार, बाजारपेठा, वाहतुक अस सगळं ठप्प होतं. त्यामुळे तेलाची विक्री प्रचंड प्रमाणात घटली. त्यामुळे जगभरातील नेहमीच्या तेल विक्रित सुमारे १ कोटी बॅरल एवढी तेलविक्रित घट झाली. मात्र ज्या प्रमाणात तेलाच्या खरेदी आणि विक्रीत घट नोंदविली गेल्या तेवढया प्रमाणात त्याचे उत्पादन म्हणजे पुरवठा मात्र घटना नाही.

**समारोप :**

जगाच्या इतिहासात गेल्या शंभर वर्षात कोणत्याही एवढया मोठया साथीच्या रोगाने थैमान घातले नव्हते. परंतु डिसेंबर 2019 मध्ये आलेल्या या कोरोना साथरोगाने जगातील 185 पेक्षा जास्त देशांमध्ये थैमान घातलेले दिसून येते. एक वर्षाचा कालावधी उलटून गेला तरी अजून या साथ रोगावर गुणकारी औषध निर्माण झालेले नाही. या कालावधीत विकसित देश असतील वा अविकसित सर्वच देशांच्या अर्थव्यवस्था डबघाईला आलेल्या दिसून येतात. या कालावधीमध्ये जगभरातील मोठे उद्योगधंदे डबघाईस आलेले दिसतात. कोरोना कालावधीत निर्माण झालेले साथीचे रोग आजही आपल्यात ठाण मांडून बसलेले आहेत. आपल्या समाजात साथीच्या रोंगाविषयी अनेक अफवा, गैरसमज, दंतकथा, अंधश्रध्दा पसरवल्या जात आहेत. प्लेग, पटकी, कॉलरा, देवी या साथीच्या रोगांबाबत हेच घडले आहे. जगाच्या इतिहासातील सर्वात मोठी ऐतिहासिक घटना किंवा महामारी असं वर्णन करावे लागणाऱ्या कोविड-19 या साथीच्या रोगाचा फटका संपूर्ण जगाला बसलेला दिसून येतो. डिसेंबर 2019 मध्ये आलेल्या जागतिक संकटाने म्हणजेच कोरोना व्हायरसमुळे संपूर्ण जग आज बदललेले दिसून येते. या काळामध्ये दोन देशातील आंतरराष्ट्रीय संबंधामध्ये अमुलाग्र स्वरूपात बदल झालेले दिसून येतात. देशांमधील आंतरराष्ट्रीय व्यापार होत असताना त्यामधील पर्यटन हा घटक महत्वाचा असल्याचे दिसून येते. भारतात दर महिन्याला २१ लाख लोक विमानमार्गानी वेगवेगळया देशातून भारतात येतात. कोरोना कालावधीतही फार मोठया प्रमाणात परदेशातून लोक भारतात आले होते. आणि त्यामाध्यमातून भारतातही कोरोनाचा प्रसार झालेला दिसून येतो. सुरूवातीच्या काळात परदेशातून येणाऱ्या लोकांना विलग ठेवण्यात अपयश आल्यामुळे मोठया प्रमाणात या विषाणूने थैमान घातले. या विषाणूचा प्रसार कशा प्रकारे होतो, हे सांगण्यातही अपयश आले आहे. कोरोना कालावधीत जगातील देशांना फार मोठया प्रमाणात आर्थिक संकटांना सामना करावा लागला आहे. अजूनही या कोरोना महामारीवर गुणकारी औषध वा लस निर्माण झाली नाही. या लस निर्मितीच्या कार्यामध्ये जगातील सर्वच शास्त्रज्ञ एकजुटीने काम करतात हे मात्र यातून आपणास दिसून आले. एखाद्या शास्त्रज्ञाने लावलेल्या शोधामुळे तो शोध दूसरा शास्त्रज्ञ तेथून पुढे घेवून जातो. या कोरोना महामारीच्या कालावधीत आपणास वेगवेगळया देशातील शास्त्रज्ञांमध्ये असणारे सहकार्य, सामंजस्य हे दिसून आले. तसेच या कोरोना कालावधी जगातील वेगवेगळया देशातील नेत्यांनी यामध्ये महत्वाची भूमिका बजावली आहे. न्यूयॉर्क,

व्हिएतनाम यांसारख्या देशांनी या जागतिक महामारीवर यशस्वी मात केलेली दिसून येते.

**संदर्भ**


1. डॉ.जे.एफ.पाटील : लॉकडाऊन, समाजवादी प्रबोधिनी, इचलकरंजी, कोल्हापूर, १ जून २०२०
2. डॉ.अरूण गद्रे : आरोग्याच्या बाजारात कोरोना, दै.लोकसत्ता, रविवार १४ जून २०२०
3. डॉ. शारदा बापट : आरोग्य सेवा आणि आपण, डॉ.अरूण, दै.लोकसत्ता, सोमवार २८ जून २०२०
4. डॉ.जे.एफ.पाटील : कोरोनाबंध , समाजवादी प्रबोधिनी, इचलकरंजी, कोल्हापूर, १ जून २०२०
5. मृदुला बेळे - करोनाच्या कृष्णछायेत, राजहंस प्रकाशन, पुणे, २०२०
6. कोरोनायण : डॉ.अनिलकुमार वावरे, प्रा.किशोर सुतार, एज्युकेशन पब्लिशर्स अॅन्ड डिस्ट्रिब्युटर्स, औरंगाबाद, २०२१
7. www.who.com
8. https://www.bbc.com/marathi/international
9. WWW.Google.com.would Report
10.